# MINUTES OF THE FIRST MEETING OF THE B.O.S IN MARATHI

## PARVATIBAI CHOWGULE COLLEGE OF ARTS AND SCIENCE (AUTONOMOUS)

Date: 5th January 2015

Time: 10.30am to 5.30pm.

Venue: 'C' Block Conference Room

सर्वप्रथम मराठी विभाग प्रमुख तसेच अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण अडसूळ यांनी अभ्यासमंडळाच्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. मराठी अभ्यास मंडळाचे जेष्ठ सदस्य प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाने गोवा राज्यात सर्वप्रथम स्वायत्त दर्जा प्राप्त करून त्यादृष्टीने केलेले मार्गक्रमण हे एक धाडसाचे पाऊल असून त्याबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

**AGENDA**

1. To approve the list of core and elective courses for undergraduate program in Marathi.
2. To approve the syllabi of Semester I and Semester II for the academic year 2015-16.
3. Recommend panel of examiners to the academic council.
4. Any other business. (A.O.B.)

| | |
|---|---|
| 1. | **AGENDA- 1**<br>To approve the list of core and elective courses for undergraduate program in Marathi. |
| 1.1 | प्रो. (डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी अभ्यासक्रमावरती भाष्य करताना समितीने कोअर आणि इलेक्टिव्ह पेपर विचारपूर्वक तयार केलेले असल्यामुळे त्यात मूलभूत बदल अपेक्षित नसून पेपरच्या शीर्षकांच्या दृष्टीने काही बदल अपेक्षित असल्याचे सांगितले. त्याला डॉ. अशोक मणगुतकर यांनी दुजोरा दिला. |
| 1.2 | साहित्यप्रकारांचा अभ्यास करतांना कालखंड निश्चित करून त्याचा शीर्षकामध्ये निर्देश केला जावा अशी प्रो. (डॉ) एस्. एम् तडकोडकर यांनी सूचना केली. |
| 1.3 | डॉ अशोक मणगुतकर यांनी काव्यशास्त्र या शीर्षकामध्ये भारतीय किंवा पाश्चात्य याचा निर्देश असावा असे मत मांडले. केवळ भारतीय साहित्यशात्राचे अध्यापन केले जावे असा विचार पुढे आला व शेवटी भारतीय साहित्यशात्राबरोबरच पाश्चात्य साहित्यशात्राचा परिचय करून द्यावा असा विचार मांडला गेला व शीर्षकामध्ये भारतीय |

| | |
|---|---|
| | व पाश्चात्य या दोन्ही नावांचा उल्लेख करण्याचे मान्य करण्यात आले. |
| 1.4 | कोअर पेपर मधला रससिध्दांत हा विषय अत्यंत छोटा असल्यामुळे व त्या पेपरमध्ये समीक्षेच्या प्रकारांचा अभ्यास अपेक्षित असल्यामुळे त्याचे शीर्षक रससिध्दांत व समीक्षा असे डॉ. मणगुतकर यांच्याकडून सुचवण्यात आले व ते सर्व सदस्यांनी मान्य केले. |
| 1.5 | भाषाशास्त्र या शीर्षकांतर्गत भाषाविज्ञान किंवा जुने भाषाशास्त्र यापैकी जे अपेक्षित असेल त्याचा नामनिर्देश शीर्षकामध्ये स्पष्ट व्हावा असे डॉ. तडकोडकर यांनी सुचवले आणि त्यानुसार भाषाशास्त्र (Philology) हे विषय शीर्षक निश्चित झाले. |
| **Resolution on the proposed courses for undergraduate program in Marathi.**<br><br>बी. ए सत्र १ एक ते ६ कोअर आणि इलेक्टीव्ह विषयांची शीर्षके वरील सूचनानुसार अभ्यासमंडळाच्या सर्व सदस्यांकडून मान्य करण्यात आली. | |
| 2. | **AGENDA- 2**<br>To approve the syllabi of Semester I and Semester II for the academic year 2015-16. |
| 2.1 (i) | प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी, नियोजित अभ्यासक्रमाची प्रत सर्वच सदस्यांनी वाचलेली असल्यामुळे वेळ वाया जाऊ न देता अपेक्षित सूचनांचा विचार करावा असे सुचवले व त्याला सर्व सदस्यांनी दुजोरा दिला. |
| (ii) | विषयाचा ऐवज लक्षात घेऊनच श्रेयांकन व तासिकांची विभागणी ठरवली जावी असे प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी सुचवले. |
| 2.2 (i) | सर्वप्रथम मराठी कथेच्या अभ्यासावरील पहिला कोअर पेपर चर्चेसाठी घेण्यात आला. त्यावर आपले विचार व्यक्त करताना प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर म्हणाले की या अभ्यासासाठी कथेचा कालखंड निश्चित केला जावा. तसेच यांचा निर्देश पेपरच्या शीर्षकामध्ये यावा. |
| (ii) | मालती बेडेकरांच्या कथांचा अंतर्भाव यात केला जावा असे श्री दीपक लोबो यांनी सुचवले. |
| (iii) | प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी उपयोजनासाठी कथांची निवड अपेक्षित आहे. असे सुचवले त्याला दुजोरा देत प्रा अडसूळ यांनी समितीने चर्चा करून त्या निवडाव्यात असे सुचवले. याकरिता समितीसमोर त्यांनी संपादित, लेखक निहाय किंवा निवडक कथा असे पर्याय ठेवले. |
| (iv) | सारिका आडविलकर यांनी कथेच्या विविध प्रवाहांचा अंतर्भाव करणाऱ्या कथा निवडल्या जाव्यात असे मत मांडले. निवडल्या जाणाऱ्या कथेमध्ये गोमंतकीय कथेचा |

| | |
|---|---|
| | अंतर्भाव व्हावा असे सोनिया सावंत यांनी सुचवले. |
| (v) | कथा आणि ललित निबंध यांतील परस्पर संबंध याविषयीची जाणीव सैध्दांतिक स्तरामध्ये करून द्यावी असे मत प्रो. डॉ. तडकोडकर यांनी मांडले. |
| (vi) | साठोत्तरीनंतरच्या कथा पाठ्यक्रमामध्ये निवडाव्या असे मत सोनिया सावंत व दिपक लोबो यांनी मांडले. तर असा कालखंड निवडला तर जुन्या कालखंडाकडे लक्ष कसे वेधता येईल यावर झालेल्या चर्चेतून जुन्या कालखंडाचा परामर्श सारांश रूपाने घेतला जावा असे मत प्रो. डॉ. तडकोडकर यांनी मांडले. |
| (vii) | १९४५ नंतर मराठी कथेचे स्वरुप विविध अंगाने विकसित झाले असल्यामुळे १९४५ – २००० असा कथा निवडीचा कालखंड सर्वमताने संमत आला. |
| (viii) | कथा निवडताना सुलभता व उत्कृष्टता यावर भर द्यावा व विद्यार्थी कथेच्या अभ्यासाकडे आकर्षित होतील अशा कथा निवडल्या जाव्यात असे मत डॉ मणगुतकर यांनी मांडले. |
| (ix) | कथेचे एकच संपादन लावले तर त्या संपादकाचा दृष्टिकोण त्यात येईल त्याऐवजी वेगळ्या प्रकारे लेखन करणाऱ्या कथाकारांच्या कथा निवडून दिल्यास त्या-त्या कथा वाचतांना अनेक संग्रह विद्यार्थ्यांच्या हातात जातील असे मत डॉ तडकोडकर यांनी मांडले. |
| (x) | यावेळी चर्चेअंती एकूण १८ कथाकार व त्यांच्या काही निवडक कथांची यादी बनवण्यात आली यापैकी १२ कथाकार व १२ कथा निवडण्याची जबाबदारी अभ्यास मंडळातील चौगुले महाविद्यालयातील सदस्यांवर सोपवली जावी आणि कथा निवडताना अध्यापन, मूल्यमापन व वैविध्य या निकषांचा वापर केला जावा असे डॉ तडकोडकर यांनी सुचवले. |
| (xi) | वरील चर्चेअंती या पेपरचे शीर्षक 'मराठी कथा स्वरूप व उपयोजन' (१९४५ – २०००) असे ठरवण्यात आले. त्याला सर्व सदस्यांनी मान्यता दिली. |
| (xii) | मराठी व्यतिरिक्त पूरक वाचनासाठी इंग्रजी, हिंदी भाषेतील तसेच या भाषांतील काही अनुवादित कथांची नावे श्री दिपक लोबो यांनी सुचवली. |
| 2.3 (i) | क्रोअर पेपर मधील दुसरा पेपर, कविता या साहित्यप्रकारावरील अभ्यासक्रम चर्चेला घेऊन त्याचा कालखंड १९४५ पर्यंत घेण्यात आला. त्यामुळे या पेपरच्या शीर्षकामध्ये 'मराठी कविता स्वरूप व उपयोजन' (आधुनिक कविता १९४५ पर्यंत) असा फेरबदल करण्यात आला. |
| (ii) | अभ्यासक्रमामध्ये कविता निवडताना नियोजित कालखंडातील पाच प्रातिनिधीक कवी निवडून त्यांच्या प्रत्येकी पाच कविता निवडल्या जाव्यात असे चर्चेअंती ठरवण्यात |

| | |
|---|---|
| | आले. यावेळी 'पाच कवी' संपा. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा संपादित कवितांचा संग्रह डॉ. तडकोडकर यांनी सुचवला व त्याला डॉ वृंदा केळकर व इतरांनी मान्यता दिली. |
| (ii) | विडंबन कविता पूरक वाचनामध्ये अभ्यासली जावी असे मत डॉ तडकोडकर यांनी व्यक्त केले. |
| (iii) | या पेपरच्या उद्दिष्टांमध्ये कवितेचं अध्यापन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांना प्राप्त होईल या मुद्द्यावर डॉ. मणगुतकर व डॉ तडकोडकरांनी समितीचे लक्ष वेधले व त्यामागील उद्देश जाणून घेतल्यावर त्यांनी या विचाराचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या नकळत त्यांच्याकडून अध्यापनाची कौशल्ये आत्मसात करवून त्याच्याकडे गट चर्चेच्या माध्यमातून तयारी करवून घ्यावी. असे डॉ. तडकोडकर यांनी सुचवले. |
| 2.4 (i) | कादंबरी या साहित्यप्रकारावर आधारित तिसरा कोअर पेपर त्यानंतर चर्चेला घेण्यात आला. यावेळी डॉ तडकोडकर यांनी केवळ परिचय व प्रकार या स्तरावरच कादंबरीचे अध्यापन केले जावे असे मत मांडले. त्याला डॉ मणगुतकर यांनी दुजोरा दिला. |
| (ii) | चर्चेअंती एकूण पाच कादंबऱ्यांची नावे सुचवण्यात आली त्यापैकी ह. ना. आपटे यांच्या 'वज्राघात' या कादंबरीची सर्वसंमतीने निवड करण्यात आली. या विषयाच्या शीर्षकात जे बदल सुचवण्यात आले त्यानुसार 'मराठी कादंबरी स्वरूप व उपयोजन' (आरंभ ते १९२०) |
| (iii) | या पेपरच्या अध्ययन आणि अध्यापनाचे उद्देश पुन्हा एकदा लिहून काढले जावेत अशी सूचना डॉ. तडकोडकर यांनी केली. |
| 2.5 (i) | नाटक या वाङ्मयप्रकाराच्या अध्ययनासाठी एकूण तीन नाटकांची चर्चा निवड समितीने केली आणि चर्चेअंती वसंत कानेटकर लिखित 'प्रेमा तुझा रंग कसा' या नाटकाची सर्वसंमतीने निवड करण्यात आली. |
| (ii) | 'मराठी नाटक स्वरूप व उपयोजन' (१९५० - २०००) असे या विषयाचे शीर्षक ठरवण्यात आले. |
| 2.6 (i) | ऑपशनल पेपर मधील 'व्यावहारिक मराठी' या विषयाचा अभ्यासक्रम पाहता तो खूपच जास्त वाटतो. हा विषय आटोपशीर होण्यासाठी त्यातील काही भाग कमी करावा अशी डॉ. मणगुतकर यांनी सूचना केली. ते पुढे म्हणाले की प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची वैचारिक क्षमता तितकी प्रगल्भ झालेली नसल्यामुळे स्मरणिका, गौरविका, मुखपृष्ठ, मलपृष्ठ हे विषय त्यातून गाळावे. त्यांच्या या मताला दिपक लोबो यांनी दुजोरा दिला. |
| (ii) | डॉ. तडकोडकर यांनी हा अभ्यासक्रम प्रायोगिक तत्वावर एक वर्ष घेतला जावा व जर |

| | |
|---|---|
| | तो वेळेत उरकता आला नाही तर एका वर्षाच्या अनुभवावरून त्याचा पुनर्विचार केला जावा असे मत मांडले त्याला अध्यक्ष व इतर सदस्यांनी मान्यता दिली. |
| 2.7 (i) | ऑपशनल पेपर मधील 'मराठी वाचन लेखन कौशल्य' यावर आपले विचार व्यक्त करताना दीपक लोबो यांनी ज्या पुस्तकांवर चित्रपट आलेले आहेत ते चित्रपट व पुस्तक असा दोन्हींचे विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे अशी सूचना केली. |
| (ii) | भाषांतर या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे या विषयाला नियोजित तासिकांमध्ये योग्य न्याय दिला जाऊ शकणार नाही अशी शक्यता डॉ तडकोडकर यांनी व्यक्त केली. चर्चेअंती भाषांतर या विषयाची अपरिहार्यता लक्षात घेऊन हा विषय अभ्यासक्रमात असावा असे सर्वानुमते ठरले. |
| **Resolution on the proposed syllabus for the academic year 2015-16** बी. ए सत्र एक आणि दोन चा अभ्यासक्रम उपर्युक्त सूचना ध्यानात घेऊन सर्वसंमतीने स्वीकृत करण्यात आला. | |
| 3 | **AGENDA 3**<br>Recommend panel of examiners to the academic council. |
| 3.1 | सर्व सदस्यांच्या सूचनेनुसार गोवा राज्यातील विविध महाविद्यालयातील परीक्षकांची नावे चर्चेला घेण्यात आली त्यातून निवड समितीने ज्या नावांना संमती दिली ती नावे खालीलप्रमाणे.<br><br>आशा मणगुतकर<br>मराठी विभाग प्रमुख<br>शासकीय महाविद्यालय<br>केपे – गोवा.<br><br>डॉ. प्रमदा देसाई<br>मराठी विभाग प्रमुख<br>मल्लिकार्जुन महाविद्यालय<br>काणकोण – गोवा.<br><br>नीता तोरणे<br>मराठी विभाग प्रमुख<br>संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालय<br>पेडणे – गोवा. |

| | |
|---|---|
| | सचिन वेटे<br>सहाय्यक प्राध्यापक<br>संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालय<br>पेडणे – गोवा. |
| 3.2 | **Resolution on the proposed panel of examiners to the academic council**<br>अभ्यास मंडळाने सर्वसंमतीने वरील परीक्षकांची नावे स्वीकृत केली. |
| 4 | AGENDA 4<br>Any other business. (A.O.B.) |
| 4.1 | अभ्यासक्रमामध्ये उपयोजन हा भाग महत्त्वाचा असून स्तुत्य आहे त्यादृष्टीने तज्ज्ञ कथाकारांच्या मार्गदर्शनाखाली कथाशिबिराचे आयोजन केले जावे अशी सूचना प्रो. डॉ. तडकोडकर यांनी दिली.<br><br>भाषांतर या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्या विषयाला योग्य न्याय देण्यासाठी एखाद्या शिबिराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना तो विस्ताराने समजावून द्यावा अशी प्रो.(डॉ) एस्. एम्. तडकोडकर यांनी सूचना केली. |

**Following members were present for the meeting-**

Mr. Shrikrishna Adsul – Chairman

Professor (Dr.) S. M. Tadkodkar – Academic Council Nominee

Dr. Ashok D. Mangutkar - Academic Council Nominee

Dr. Vrunda Kelkar – Vice – Chancellor, Goa University Nominee

Shri Deepak Lobo – Industry Representative

Ms. Sonia Sawant - Alumni

Ms. Sarika Advilkar – Member Secretary

Ms. Vaishali Patil – Member.

Dated: 9th January, 2015

Shri. Shrikrishna Adsul
Chairman